# पूर्वकिशोरावस्थेतील मुला-मुलींच्या स्व संकल्पनेवर होणारा परिणाम

**डॉ. मालती वि. पाटील**
तायवाडे महाविद्यालय ,महादुला ,
कोराडी, जि. नागपूर

---

**प्रस्तावना :**

कुटुंब ही मुलांची प्रथम पाठशाला असते पहिला पाच वर्षात मुलांच्या मनावर जे संस्कार होतात त्यांचा परिणाम मुलांच्या समग्र जीवनावर होत असतो. कुटुंबातून मुलांना जे वळण लागते त्याचा उपयोग पुढील आयुष्यात होत असतो. आई-वडिलांकडून अनेक गोष्टी मुलं अनुकरणाने शिकत असतात. कुटुंबात सर्व साधारण मुलांचा विकास विशिष्ट पद्धतीने होत असतो गर्भधारणेपासून ते किशोरांपर्यंत विकासाचा कालखंड असतो. जन्मतः मुले आनुवंशाने संक्रमित क्षमता घेऊन येतात. मुलांना योग्य वातावरण व संधी उपलब्ध असल्यास त्यांचा योग्य विकास होतो. व्यक्तीच्या जीवनात विकासाच्या अवस्था या महत्त्वाच्या असतात. अर्भकावस्था, शैशवावस्था, बाल्यावस्था, किशोरावस्था या अवस्थांमध्ये मुलांचा विकास क्रमाक्रमाने होत असतो. प्रत्येक अवस्था जरी महत्त्वाची असली तरी त्यामागील कारणे ही भिन्न स्वरूपाची आढळतात. काही अवस्था त्यांच्या तात्कालीन परिणामामुळे काही दीर्घकालीन परिणामामुळे तर काही शारीरिक, मानसिक परिणामामुळे विशेष महत्त्वाची ठरतात. मुलांच्या वयानुसार त्यांच्या विकासात बदल होत असतात.

बाल्यावस्थेनंतरचा व प्रौढावस्था येण्यापूर्वीचा काळ किशोरावस्था समजला जातो. किशोरवस्थेचा हा काळ व्यक्तिमत्व विकासाचा आधार असल्यामुळे व्यक्तिमत्व विकास, स्व संकल्पनांची धारणा काही अंशी आत्मवा सविकीकरणातून तर काही अंशी इतरांच्या मूल्यांकनातून होत असते. वयाच्या परिपक्वते बरोबर आपल्या कृतीचा वर्तमानाचा दुसऱ्यांवर काय परिणाम होईल हे ओळखायला मुले शिकतात. या वयात मुलं स्वतःच्या जीवनाविषयीचे तत्वज्ञान मांडायला सुरुवात करतात तसेच त्यांचा आत्मविश्वास वाढतो व निर्णय क्षमता विकसित होत असते.

**परिभाषा :**

**(पूर्व किशोरावस्था) कुल्हन यांच्या मते**:

"किशोरावस्था म्हणजे बाल्यकाळ व प्रौढावस्थेच्या मध्याचे परिवर्तन कालावधी होय." 12 वे वर्ष संपले की मुले किशोरावस्थेच्या पायरीवर येऊन पोहोचतात. साधारणतः 13 ते 17 वर्ष पूर्व किशोरावस्थेचा काळ मानला जातो. पूर्वकिशोरावस्थेला शारीरिक ,मानसिक,भावनिक ,सामाजिक परिपक्वतेचा काळ समजला जातो.

**स्व-संकल्पना :**

पं.कुलकर्णी व गोरे यांच्या मते:-"व्यक्ती जगाकडे कशी बघते आणि जग व्यक्तीला कसे ओळखते हे निश्चित करणारी व्यक्तींची स्वतःची प्रतिमा म्हणजे त्या व्यक्तींची स्व-संकल्पना होय."वाढत्या वयाबरोबर मुलांचा अधिकाधिक व्यक्तींशी संबंध येतो व त्याच्या संबंधात होणाऱ्या अनन्य क्रियांमुळे त्याची स्वतःविषयी एक कल्पना बनू लागते. प्रस्तुत संशोधनात पूर्व किशोरावस्थेतील मुलामुलींच्या स्व-संकल्पनेवर परिणाम होतो. याबाबत काही उद्दिष्टे निश्चित केली ती पुढील प्रमाणे:-

Research Hub International Journal

**उद्दिष्टे :**

1) पूर्वकिशोरावस्थेतील मुलामुलींच्या स्व- संकल्पनेचा कुटुंब प्रकारानुसार तुलनात्मक अभ्यास करणे.

2) पूर्व किशोरावस्थेतील मुलामुलींच्या स्व- संकल्पनेचा लिंगभेदानुसार तुलनात्मक अभ्यास करणे.

**साहित्य अवलोकन :**

**(स्वसंकल्पना)** स्वतःचे स्वतःविषयीच्या कल्पना ,भावना ,अभिवृत्ती, आवडी-निवडी, सवयी, क्षमता, राहणी, प्रेरणा इत्यादींचे संदर्भात केलेले मूल्यांकन म्हणजे स्व-संकल्पना होय."

या वयात स्वतः विषयी विशेष जाणीव निर्माण होते. स्वतःच्या क्षमतांची जाणीव होते. इतरांशी तुलना करून स्वत्व जपण्याची वृत्ती वाढीस लागते.

**पूर्व संशोधनाचा आढावा : स्व- संकल्पनेविषयी झालेली संशोधने**

**गुप्ता आर (1994)** : आईची वागणूक मुलांबरोबरची जवळीक, स्वतः संबंधी अनाहतपणा, नकार देणे इत्यादी गोष्टी स्व संकल्पनेत समाविष्ट होत्या. यांच्या अध्ययनात 14 ते 17 वयोगटातील 100 किशोर मुलींवर SCQ आणि CRPBI ही चाचणी घेण्यात आली. या संशोधना अंतर्गत मुख्यतः असे आढळून आले की, आकडेवारीनुसार किशोरवयीन मुलींमध्ये स्व संकल्पना, आकलन क्षमता यामध्ये सहसंबंध हा सकारात्मक आढळला. तसेच एक केंद्रीय असणारी व राग येणारी यांची नैतिक स्व-संकल्पना ही जास्त सकारात्मक असते. यांच्या मातृत्वाचे बरेचसे साम्य आढळले.

**लीने एस.** (2007) : यांच्या प्रस्तुत अध्ययनात मुलांमधील भावना व त्यांची स्वतःबद्दल समजूत यांची माहिती व्यक्त केल्याचे दिसून येते. यांच्या अध्ययनात मुलांमध्ये आत्मविचार, भावना व भिन्न लिंगानुसार परीक्षण करण्यात आले. 91 मुलांची (52 मुली व 39 मुले) यांच्या स्व नियमन, स्वभावना यांचे मूल्यांकन प्रत्यक्ष मुलाखतीतून करण्यात आले. मुलामुलींमध्ये शारीरिक स्व संकल्पना व भावनिक स्व संकल्पना यात नकारात्मक सहसंबंध असल्याचे दिसून आले स्वबद्दलच्या प्रतिक्रिया विशेषणात असे स्पष्ट होते की, भावनिक प्रतिक्रिया समजण्याकरिता शारीरिक व व्यवहारिक संदर्भाचा विचार अधिक केला जातो.

**संशोधन पद्धती :**

पूर्व किशोरावस्थेत झालेल्या विकासाचा व्यक्तीच्या पुढील विकासावर फार मोठ्या प्रमाणात परिणाम होत असतो. प्रस्तुत संशोधनात पूर्व किशोरावस्थेतील मुलामुलींची स्व- संकल्पना यांचा अभ्यास करण्यासाठी ठरविण्यात आलेल्या संशोधन प्रक्रियेमध्ये खालील पायऱ्यांचा समावेश करण्यात आला.

**संशोधन परिवर्त्यांची निवड** :

प्रस्तुत संशोधनात कुटुंबाचा प्रकार, लिंग ही दोन स्वतंत्र परिवर्त्य (Independent Variable) वापरली आहे. तसेच स्व संकल्पना या अश्रित परिवर्त्याचा (Dependent Variable) उपयोग केला आहे.

**संशोधन क्षेत्राची निवड :**

पूर्व किशोरावस्थेतील मुला मुलींच्या स्व संकल्पनेवर कुटुंबाच्या प्रकाराचा काय परिणाम होतो. याचा अभ्यास या शहरात सहज शक्य होईल असे वाटल्यामुळे नागपूर शहराची निवड या संशोधनासाठी केली.

**नमुना निवड पद्धती** :

प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवडीसाठी संभाव्यता नमुना निवड पद्धती अंतर्गत येणाऱ्या यादृच्छिक आणि स्तरीय यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा उपयोग केला.

Research Hub International Journal

**नमुना निवड** :

नागपूर शहरातील पूर्व ,पश्चिम, उत्तर, दक्षिण व मध्य अशा पाच विभागात असलेल्या शाळांपैकी प्रत्येकी 6 शाळांमधून यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवड केली. प्रत्येक विभागातून निवडलेल्या 6 शाळा मधून स्तरीय यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने (वर्ग 7 ते वर्ग 10) 50% मुले व 50% मुलींची निवड केली.

**नमुन्याचा आकार** :

प्रस्तुत संशोधनासाठी नागपूर शहर विभागातून 30 शाळांपैकी 17 शाळांमधून प्रत्येकी 24 व उरलेल्या 13 शाळांमधून प्रत्येकी 22 मुले मुली निवडली तर संयुक्त कूटुंबातील 121 मुलं व 121 मुली तसेच विभक्त कूटुंबातील 230 मुलं व 222 मुली अशा एकूण 694 मुला-मुलींची नमुना म्हणून निवड केली.

**तथ्य संकलन पद्धती, साधने व तंत्रे** :

मुलामुलींची स्व संकल्पना किती स्पष्ट आहे, त्यात काय फरक आहे, हे तपासून पाहण्यासाठी अनुमापन तंत्राच्या मदतीने तथ्य संकलन करण्याच्या पद्धतीची निवड केली. प्रस्तुत संशोधनात तीव्रता मापक अनुमापांचा उपयोग केला गेला.

तसेच पूर्व किशोरावस्थेतील मुला-मुलींची स्व संकल्पना तपासून पाहण्यासाठी खालील अनुमापन तंत्राचा उपयोग केला.

**(I) स्व संकल्पना चाचणी -** Children Self Concept Scale( C S C S ) Dr. S. P. Ahluwalia

**विश्वसनीयता व वैधता (विश्वसनीयता)** :

स्व संकल्पना चाचणीची विश्वसनीयता तपासून पाहण्यासाठी परीक्षण व पुर्नपरीक्षण या पद्धतीचा उपयोग केला या पद्धतीने गणन केलेला सहसंबंध हा .70 आला. या पद्धतीचे निकाल समाधान कारक असल्यामुळे त्यांचाच उपयोग माहिती संकलन करण्यासाठी केला.

**(वैधता)** :

डॉ. एस. पी. आलू वालिया यांच्या स्व संकल्पना (Children Self Concept Scale (C S C S) या चाचणीच्या वैधतेचा प्रस्थापित सहसंबंध .90 होता. त्यांच्या तुलनेत घेतलेला चाचणीचा सहसंबंध .84 होता. या चाचणीची वैधता तपासण्यासाठी वापरलेल्या चाचणीचा निकाल समाधानकारक असल्यामुळे त्यांचा उपयोग केला.

**अनुमापन तंत्राचा उपयोग व मापन तंत्रे** :

स्व संकल्पना या चाचणी मापनासाठी शाळेतील प्रमुख अधिकाऱ्यांची परवानगी घेतली. शाळेतील निवडलेल्या मुलांमुलींना स्व संकल्पना चाचणी मधील प्रश्ना विषयी माहिती देण्यात आली तसेच सर्व प्रश्न काळजीपूर्वक सोडून घेतले.

पूर्व किशोरास्थेतील मुलामुलींकडून स्व संकल्पना चाचणी भरून घेतल्यानंतर चाचणीच्या माहितीपत्रकात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांचे गुणांकन केले मिळालेल्या गुणांकाची सांख्यिकीय सार्थकता तपासून पाहण्यासाठी योग्य त्या सांख्यिकीय पद्धतीचा उपयोग केला.

**तथ्यांचे वर्गीकरण व सारणीकरण** :

प्रस्तुत संशोधनासाठी जी तथ्य संकलित केली ती संशोधनाच्या उद्दिष्टांनुसार कुटुंबाचा प्रकार आणि लिंगभेदानुसार वर्गीकृत करण्यात आली. वर्गीकृत तथ्यांचे योग्य प्रकारे सारणीकरण करण्यात आले.

Research Hub International Journal

**सांख्यिकीय पद्धतीची निवड :**

पूर्व किशोरावस्थेतील मुला मुलींची सर्वसाधारण माहिती तसेच स्व संकल्पना या चाचणीचा उपयोग करून माहिती गोळा करण्यात आली. कुटुंबाचा प्रकार तसेच लिंगभेदाचा मुला मुलींच्या स्व संकल्पनेवर होणारा परिणाम स्पष्ट करण्यासाठी व त्यांची सांख्यिकीय सार्थकता तपासण्यासाठी खालील सांख्यिकीय पद्धतीचा उपयोग केला.

**1. व्दिमार्गीय ANOVA पद्धती (प्रचरण विश्लेषण पद्धती( 'F' Test)** पूर्व किशोरावस्थेतील मुला मुलींची स्व संकल्पनेचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यासाठी व्दिमार्गीय परीक्षा (Two way) ANOVA पद्धतीचा उपयोग केला.

**2. टि परीक्षा पद्धती** ('t' test) समग्राचा अधिक सखोल अभ्यास करण्यासाठी तथ्यांचे लिंगभेदानुसार वर्गीकरण करून त्यांची सांख्यिकीय सार्थकता तपासून पाहण्यासाठी 't'test या सांख्यिकीय परीक्षा पद्धतीचा उपयोग केला.या पद्धतीने पुर्वकिशोरावस्थेतील मुलामुलींची  लिंगभेदानुसार सांख्यिकीय सार्थकता तपासून पाहिली.

**गृहीतकृत्य** :

संशोधन विषयासंबंधी असणाऱ्या पूर्वज्ञानाच्या आधारे तसेच या विषयाच्या विविध पैलूंच्या केलेल्या अभ्यासाच्या आधारे काही **गृहीतकृत्य** निश्चित केलेली आहेत ती खालील प्रमाणे :-

1. पूर्व किशोरावस्थेतील मुला-मुलींच्या स्व संकल्पनेमध्ये कुटुंबा प्रकारानुसार (विभक्त आणि संयुक्त ) अंतर नसते.
2. कुटुंबाचा प्रकार (विभक्त आणि संयुक्त) आणि लिंगभेद यांच्या संयुक्त गटात पूर्वकिशोरावस्थेतील मुलामुलींच्या स्व संकल्पनेमध्ये अंतर नसते.

**सांख्यिकिय विश्लेषण व अनुमान :**

संशोधनाचे निकाल आणि त्यांचे सांख्यिकीय विश्लेषण पुढील भागात विभागले गेले. सर्वसाधारण माहितीत कुटुंबाचे प्रमाण व मुलामुलींचे लिंग भेदाप्रमाणे प्रमाण या बद्दलची माहिती वर्णनात्मक सांख्यिकीय पध्दतीने माध्य/टक्केवारी काढून प्रस्तुत केली

**मुला मुलींची लिंगभेदाप्रमाणे विभागणी**

| कुटुंब प्रकार | विभक्त कुटुंब | | संयुक्त कुटुंब | |
|---|---|---|---|---|
| लिंगभेद | मुलं | मुली | मुलं | मुली |
| संख्या (प्र.श.) | 230(33%) | 222(32%) | 121(17.5%) | 121(17.5%) |

**निष्कर्ष आणि चर्चा :**

1) विभक्त व संयुक्त कुटुंबातील पूर्व किशोरावस्थेतील मुला-मुलींच्या स्व संकल्पनेमध्ये फरक असतो. विभक्त कुटुंबातील पूर्व किशोरावस्थेतील मुला-मुलींची स्व संकल्पना संयुक्त कुटुंबातील पूर्व किशोरावस्थेतील मुला मुलींच्या स्व संकल्पनेपेक्षा अधिक स्पष्ट असते.
2) कुटुंबाचा प्रकार (विभक्त व संयुक्त) आणि लिंगभेद यांच्या संयुक्त गटात पूर्वकिशोरावस्थेतील मुला-मुलींच्या स्व संकल्पनेमध्ये फरक असतो.
3) विभक्त कुटुंबातील पूर्व किशोरावस्थेतील मुलांची स्व संकल्पना संयुक्त कुटुंबातील  मुलांच्या स्व संकल्पना पेक्षा अधिक स्पष्ट असते.
4) विभक्त कुटुंबातील पूर्वकिशोरावस्थेतील मुलींची स्व संकल्पना संयुक्त कुटुंबातील मुलींच्या स्व संकल्पनेपेक्षा अधिक स्पष्ट असते.

Research Hub International Journal

विभक्त कुटुंबात मुलांच्या प्रगतीकडे आणि आवश्यकतांकडे वैयक्तिक लक्ष पुरविले जाते. मुलांना त्यांचे विचार व्यकत करण्याची मुभा असते. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो. मुलांमध्ये स्वत:चा विकास होऊन त्यांची स्वसंकल्पना चांगली होण्यास मदत होते. तसेच मुलांच्या सुप्त गुणांच्या विकासाकडे सातत्याने प्रयत्न केले जातात. त्यामुळे विभक्त कुटुंबातील मुला-मुलींची स्व-संकल्पना अधिक स्पष्ट असते.

**शिफारसी /सूचना :**

1) पालकांनी आपल्या मुला-मुलींना आत्मनिर्भर होण्यासाठी सतत प्रोत्साहित करावे.

2) पालकांनी व शिक्षकांनी मुलांमुलींची स्व संकल्पना विकसित व्हावी म्हणून त्यांच्यावर जबाबदाऱ्या देतांना जबाबदारीची जाणीव त्यांच्यात रुजवावी.

3) पालकांनी मुलामुलींच्या भावभावनांकडे लक्ष देऊन त्यांचा सकारात्मक दृष्टिकोन विकसित करावा जेणे करून त्यांचा आत्मविश्वास वाढीस लागेल.

4) पालकांनी आपल्या पाल्याचे सुप्त गुण व कौशल्य ओळखावे तसेच नवनवीन अनुभवांसाठी मुला मुलींना प्रोत्साहन देऊन संधी उपलब्ध करून द्याव्यात व बदलत्या काळाकडे लक्ष ठेवून त्यांच्याशी सुसंवाद साधावा.

**संदर्भ सूची :**


- डॉ. बोरुडे, डॉ.कुमठेकर, डॉ.भरत देसाई, डॉ.शीला गोळविलकर--वैकासिक मानसशास्त्र
- आशा परुळेकर -- व्यक्तिमत्व विकास
- प्रा.र.वी. पंडित, डॉ.अ.वि.कुलकर्णी, डॉ.च.वी. गोरे --सामान्य मानसशास्त्र
- सौ. सुमेधा लेले, सौ. मनीषा अष्टपुत्रे-- बालविकास
- वी. एस. दर्यापूरकर, अण्णासाहेब खोत, सौ. भूपाळी दर्यापूरकर-- वैकासिक मानसशास्त्र
- प्रा.रा.ना. घाटोळे--सामाजिक मानसशास्त्र
- डॉ.पुरुषोत्तम बोरकर --मानसशास्त्र मानवी वाढ व विकास
- डॉ. सुधीर बोधनकर, प्रा.विवेक अलोनी-- सामाजिक संशोधन पद्धती
- डॉ. प्रदीप आगलावे-- संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे
- Dr. S.P. Ahluwalia --children sale concept scale (cscs) (manual)
- S.P. Gupta-- particles statistic
- H.E.Gurrett--statistic in psychology and education
- डॉ. पु.ल. भांडारकर-- सामाजिक संशोधन पद्धती
- प्रा.ना. घाटोळे-- समाजशास्त्रीय संशोधन तत्व आणि पद्धती, सामाजिक शास्त्र आणि संशोधन
- W. j. Goode and p.k. hot--t methods in social research
- R. Gupta,--journal of the Indian academy of applied psychology 20(1)


Research Hub International Journal

- Lene s.-- journal of research in childhood education 2007
- राम बिहारी सिंह तोमर --व्यक्तिमत्व
- श्रीमती गायत्री बर्मन, श्रीमती शशी प्रभात जैन --किशोरावस्था विवाह एवं परिवार
- उषा भार्गव --किशोर मनोविज्ञान

**परिशिष्टे :**

- कौटुंबिक सर्वसाधारण माहिती प्रश्नावली.
- Children's Self Concept Scale (C.S.C.S.) Dr. S.P. Ahluwalia Kolhapur (Maharashtra)
- नागपूर शहरातील पूर्व ,पश्चिम,मध्य, उत्तर, दक्षिण भागातील यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या शाळा

Research Hub International Journal